वर्ष- १० अंक- २५ मुंबई, मंगळवार, ०७ मे ते १३ मे २०२४ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 उल्हासनगरात डान्सबारच्या मालकावर प्राणघातक हल्ला

3 → ६५ व्या वर्षात पदार्पण

झोपेत होणारे केसांचे नुकसान टाळण्यासाठी खास एक्सपर्ट टिप्स ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## महाराष्ट्र युनियन ऑफ जर्नालिस्टचे मराठवाडा अध्यक्ष व श्रीमंत पेशवा प्रतिष्ठानचे
# श्री. संजय गोविंदराव कुलकर्णी (सुपेकर) यांना जर्मनी आंतराष्ट्रीय हेसेन विद्यापीठाकडून समाजसेवेमध्ये डॉक्टरेट ऑफ फिलॉसोफी पदवी बहाल

### २२ वर्षांच्या सामाजिक कार्याची जर्मनीच्या विद्यापीठाने घेतली दखल ▌ रजिस्ट्रार श्वेतला कोडक व सिनेअभिनेत्री अमिषा पटेल यांच्याहस्ते प्रदान

**गंगाखेड, प्रतिनिधी** : परभणी-शहरासह संपुर्ण महाराष्ट्रात गेल्या २५ वर्षांपासून समाजासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करुन आपला ठसा वेगळा निर्माण करणारे श्री. संजय गोविंदराव कुलकर्णी (सुपेकर) यांची जर्मनी येथील हेसेन अंतराष्ट्रीय विद्यापीठाने दखल घेऊन त्यांना शनिवार दि. २० एप्रिल २०२४ रोजी पुणे येथील रेडीसन ब्लू हॉटेल या पंचतारांकीत हॉटेलमध्ये जर्मनी युनिवर्सिटी विद्यापीठाच्या रजिस्टर श्वेतला कोडक यांच्या समुहासह सुप्रसिध्द सिनेमा अभिनेत्री अमिषा पटेल यांच्या हस्ते ऑनरिस कॉसा डॉक्टर ऑफ फिलॉसोफीने सन्मानित करण्यात आले. यावेळी देशातील अनेक राज्यातील अनेक प्रतिनीधींना देखील उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. याबाबत माहिती अशी की, परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील रहिवाशी संजय गोविंदराव कुलकर्णी (सुपेकर) यांनी २००१ ते २०२४ या काळात समाजासह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कायार्चा आढावा पुढीलप्रमाणे आहे.



**शासन प्रशासन तथा सेवाभावी संस्थांकडून पुरस्कार आणि प्रशस्तीपत्रकांद्वारे सन्मानित**
- सन २०१९ : मुंबई येथे शोधपत्रकारीता पुरस्कार
- सन २०२२ : अमरावती जिल्ह्यात धर्मभुषण पुरस्कार.
- शिर्डी येथे बेस्ट लॉयन ऑफ रिझन पुरस्कार
- सन २०२३ : नागपुर येथे समाजरत्न पुरस्कार
- सन २०२४ : परळी येथे संघर्ष योध्दा पुरस्कार
- संभाजीनगर येथे इंटरनॅशनल लायन्स क्लब च्या वतीने पुरस्कार

गेल्या 25 वर्षांपासून परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालूक्यात समाज सेवेमध्येनावारुपाला आलेले संजय कुलकर्णी (सुपेकर) हे एक अष्टपैलू व्यक्तीमत्व आहे. ज्या स्त्रीयांचे विवाह जुळून येत नाहीत अशा स्त्रियांचे विवाह किंवा पुनःविवाह तसेच गरीब मुलांचे मुंज विधी प्रत्येक वर्षी स्व-खचार्ने करुन देतात. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यामध्ये हि समाजसेवा त्यांची अखंडपणे सुरुआहे. तसेच दै. सामना, दै. पुढारी, दै. पुण्य नगरी, दै. क्रांतिशीलयुवा, दै. मराठवाडा साथी, दै. देशोन्नती अशा अनेक वर्तमानपत्रात परखडतेने लिखान करुन संजय सुपेकर यांनी आपली महाराष्ट्रात वेगळीच प्रतिमा निर्माण केली.

वर्तमानपत्रात काम करीत असताना संजय सुपेकर यांच्यावर अनेकवेळा त्यांच्या परखड व ज्वलेत लिखानामुळे प्राणघातक हल्ले देखील झाले आहेत. स्वतःच्या गावासह महाराष्ट्रात अनेक ठिकाणी समाजासह विविध क्षेत्रात काम करीत असताना त्यांना अगदी तारेवरची कसरत कसरतच करावी लागली. संजय सुपेकर हे महाराष्ट्रातील अनेक क्षेत्रात विविध पदांवर काम करीत असुन हा सर्व खडतर प्रवास करीत असताना जर्मनीच्या हेसेन अंतराष्ट्रीय विद्यापीठाने त्यांच्या कायार्ची दखल घेऊन जर्मनी विद्यापीठाच्या प्रमुख रजिस्टार श्वेतला कोडक यांचा समुह व प्रसिध्द सिनेमा अभिनेत्री विशेष म्हणजे अर्थशास्त्र विषयाची गोल्ड मेडलिस्ट असलेल्या अमिषा पटद्देल यांच्याहस्ते त्यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल ऑनरेस कॉसा डॉक्टर ऑफ फिलॉसोफीने सन्मानित करण्यात आले. यावेळी पदवी स्विकारताना श्रीसंजय सुपेकर म्हणाले की हि पदवी माज्या समाजासह मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या विविध क्षेत्रात सामाजिक काम करण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आहे. मी त्यांच्या सहकायार्मुळेच डॉक्टरेट पदवी मिळवू शकलो. या पुढेही माज्या समाजासह सर्वच क्षेत्रात पुर्ण वेळ देऊन कार्य करणार आहे असे सुपेकरांनी सांगितले.

**विविध संस्थामधील पदे**
- परशुराम आर्थिक विकास महामंडळ संघर्ष समिती -महाराष्ट्र राज्य प्रदेश प्रवक्ता.
- महाराष्ट्र युनियन ऑफ जर्नालिस्ट - मराठवाडा विभाग अध्यक्ष
- आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट - सामाजिक विभाग कार्यकारी सचिव
- अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ - महाराष्ट्र राज्य प्रदेश प्रवक्ता.
- श्रीमंत पेशवा
- अखिल भारतिय सकळ ब्राह्मण महासंघ - अध्यक्ष
- ऑल इंडिया ॲन्टीकरप्शन ॲन्ड ह्यूमन राईट्स कमिशन - सचिव
- साप्ताहिक पोलीस बातमीपत्र - कार्यकारी संपादक
- दै. महाराष्ट्र प्रतिमा (परभणी जिल्हा आवृत्ती) - संपादक
- साप्ताहिक जनपंचायत - मालक



# बलात्कारातून जन्मलेल्या मुलाची विक्री !
## ▌नालासोपाऱ्यात अल्पवयीन मुलीवर बलात्कार ▌ दोनदा प्रसूती

**नालासोपारा** : नालासोपाऱ्यातील अल्वपयीन मुलीवर दोन वर्षात दोनदा बलात्कार करून तिला गर्भवती करण्यात आले आहे. तिच्या पहिल्या मुलाची विक्री केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तिच्यावर झालेल्या पहिल्या बलात्कारामुळे झालेल्या बाळाची विक्री करण्यात आली होती. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी तिच्यावर बलात्कार करणाऱ्या दोन तरुणांसह रुग्णालयातील डॉक्टर, माजी नगरसेविकेसह १६ जणांवर बलात्कार, पोक्सोसह विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी १७ वर्षांची आहे. दोन वर्षांपूर्वी तिचे परिसरातील एका तरुणाशी प्रेमसंबंध जमले. त्यातून ती गर्भवती राहिली होती. मात्र प्रियकराने याचा इन्कार केला. त्यामुळे माजी नगरसेविकेच्या मदतीने प्रकरण मिटवण्यासाठी प्रियकराकडून ४ लाख रुपये घेतले. माजी नगरसेविका, पीडितेचे आई-वडील, मध्यस्थ आदींनी पैसे वाटून घेतले. नंतर तिची नालासोपाऱ्यातील एका रुग्णालयात प्रसूती करण्यात आली. तिचे बाळ बळजबरीने एका महिलेकडे



देण्यात आले आणि त्या बाळाची विक्री करण्यात आली.

हे प्रकरण मिटवण्यासाठी पालकांनी घर बदलले. मात्र तेथेही एका तरुणाने तिच्या अज्ञानाचा फायदा घेत शरीरसंबंध प्रस्थापित केले. यावेळी अमरावती येथील एका रुग्णालयात तिने बाळाला जन्म दिला. मात्र तरुणाने तिच्याशी लग्नास नकार देऊन सोडून निघून गेला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडितेने एका महिला सामाजिक कार्यकर्तीसह आचोळे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी खासगी रुग्णालयाचे डॉक्टर्स, बलात्कार करणारे दोन नराधम, मुलीचे आई-वडील, माजी नगरसेविका, मुलीची विक्री करणारी महिला अशा १६ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. बलात्कार, अपहरण, नवजात बाळाचा त्याग करणे, अपहरण आदींच्या कलम ३७६, ३७६ (२) (एन) ३१७, ३६३, ३७१ तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) च्या कलम ४, ६, ७, १२, २१ सह लहान मुलांच्या ज्युवेनाईल ॲक्ट २०१५च्या कलम ७५ अन्वये हे गुन्हे दाखल करण्यात आले. मुलगी अल्वपयीन असतानाही दोन रुग्णालयांच्या डॉक्टरांनी तिची प्रसूती केली आणि पोलिसांना कळवले नसल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. मुलीच्या आई-वडिलांनी मुलगी अल्पवयीन असतानाही बाळाची विक्री करण्यास संमती दर्शवली होती म्हणून त्यांनाही आरोपी करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. आम्ही या प्रकरणात गुन्हा दाखल केला असून आता आरोपींना अटक करत आहोत. पुढील तपासात आणखी नावे समोर येण्याची शक्यता असून त्यांच्यावरही गुन्हे दाखल करून अटक करण्याची कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

# अनधिकृत बॅनर्स,पोस्टर्स पालिकेच्या रडारवर

**भिवंडी**: लोकसभेच्या निवडणुकीसाठी परवानगी न घेता बेकायदेशीरपणे बॅनर,पोस्टर लावणाऱ्यांच्या विरोधात भिवंडी महापालिका कडक झाली असून, शहरातील विद्युत खांब आणि भिंतींवर बेकायदेशीरपणे बॅनर, पोस्टर लावल्याच्या तक्रारीनंतर प्रशासनाने ते हटवून निजामपूरा पोलिस ठाण्यात अज्ञातांवर गुन्हा दाखल केला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू असतानाही शहरात बेकायदा बॅनर आणि पोस्टर्स लावल्याची तक्रार भिवंडी महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांच्याकडे आली होती.याची दखल घेत आयुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना आपापल्या प्रभागात बेकायदेशीरपणे लावलेले सर्व बॅनर पोस्टर्स तत्काळ हटवण्याच्या सूचना दिल्या होत्या.याशिवाय शहरात अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेशही आयुक्तांनी दिले आहेत.याच अनुषंगाने प्रभाग समिती क्रमांक पाचचे सहाय्यक आयुक्त बाळाराम जाधव यांनी त्यांच्या परिसरात



भेट देऊन कारवाई करून विद्युत खांबांवर बेकायदेशीरपणे लावलेले बॅनर पोस्टर जप्त केले.यासह बॅनर,पोस्टर लावणाऱ्या अज्ञातांच्या विरोधात महानगरपालिका अधिनियमाच्या विविध कलमान्वये निजामपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मालुमा इंग्लिश प्रायमरी हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, गारमेंट वन गेट फ्री आणि आदर्श बालवाडी गर्ल्स इन्स्टिट्यूट नावाचे पोस्टर व बॅनर रस्त्यावरील विद्युत खांबावर बेकायदेशीरपणे लावल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



# उल्हासनगरात डान्सबारच्या मालकावर प्राणघातक हल्ला

**उल्हासनगर :** उल्हासनगरात डान्स बारच्या मालकावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना घडली. विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले असून याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

उल्हासनगरच्या श्रीराम चौक हा डान्स बारमुळे बदनाम झालेला आहे.या चौकात हंड्रेड डेज, पल, राखी हे डान्सबार आहेत. या डान्सबारमध्ये यापूर्वीही अनेक वेळा कायदे आणि नियम धाब्यावर बसून बारबाला नाचवल्याबाबत स्थानिक विठ्ठलवाडी पोलीस तसेच बाहेरून आलेल्या पथकांनी कारवाई केलेली आहे. या डान्सबार वाल्यांमध्ये अनेकवेळा विविध कारणांवरून वाद होऊन त्याचे पर्यावसान हाणामारीत होत असते. असे असले तरी हे डान्सबार कायमस्वरूपी बंद करण्यासाठी स्थानिक पोलीस तथा राज्य उत्पादन विभागाकडून कारवाई केली जात नाही. यामागे मोठे अर्थकारण असल्याचे दिसून येत आहे.विशाल उर्फ रतन शुक्ला याने दोन दिवसांपूर्वीच सत्यम बारमधील नोकरी सोडून हंड्रेड डेज बारमध्ये काम करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे दोन्ही बारच्या व्यवस्थापकांमध्ये मतभेद निर्माण झाले होते.रात्रीच्या सुमारास दोन्ही पक्ष हंड्रेड डेज बारजवळ चर्चेसाठी एकत्र आले.ज्यामध्ये हंड्रेड डेजच्यावतीने मालक सनी वसिटा, वाहिद शेख, मुन्ना यादव आणि रतन शुक्ला आणि सत्यम बारच्यावतीने अन्नू केदार, त्याचे मित्र विशाल मोहिते आणि आकाशसिंग लबाना आले होते. दरम्यान दोन्ही गटात वाद झाला. त्याचे पर्यावसान हाणामारीमध्ये झाले.संधीचा फायदा उचलत अन्नू केदारने कमरेला खोचलेला चाकू सनीच्या गळयावर मारला. परंतु सनीने वार चुकवल्याने गळयाच्या खाली जखम झाली. पुन्हा एकदा अन्नू केदारने सनीवर चाकूने वार करून पोटात चाकू भोसकला. तसेच विशाल मोहिते आणि आकाश सिंग लबाना यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. सनीचे सहकारी वाहीद शेख, विशाल उर्फ रतन शुक्ला, मुन्ना यादव हे सनीला वाचवण्यासाठी पुढे आले असता अन्नू केदार याने त्यांना चाकू दाखवून कोई आगे आया तो खल्लास कर दूंगा, अशी जिवे ठार मारण्याची धमकी दिली.जखमी असलेल्या सनी वसिटाला खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सनी वसीटाने दिलेल्या फिर्यादीवरून अनु केदार, विशाल मोहिते आणि आकाशसिंग लबाना याना अटक करण्यात आली आहे.

## पोलिसांकडून ५ जणांना अटक



- त्यानंतर सनीच्या मित्रांनी अन्नू केदारवर हल्ला केला होता.त्यामुळे पोलिसांनी सनी वसिटा, वाहिद शेख, मुन्ना यादव, रतन शुक्ला यांच्या विरोधात अन्नू केदार याच्या फिर्यादीवरुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
- विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पडवळ, पोलीस निरीक्षक विक्रम गौड यांच्या पोलीस पथकाने तत्काळ दोन्ही गुन्ह्यातील मिळून पाच जणांना अटक केली आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. मात्र डान्सबारमुळे वाढलेली गुन्हेगारी ही विठ्ठलवाडी पोलिसांच्या डोक्याला ताप झाली आहे.

# विरारमध्ये दुकानाला आग



**नालासोपारा :** नालासोपाऱ्यातील द्वारका हॉटेल मंगळवारी जळून खाक झाल्यानंतर बुधवारी पुन्हा सकाळी विरारमध्ये एका दुकानाला भीषण आग लागली. पश्चिमेकडील रेल्वे स्थानकाबाहेर असलेल्या दुकानात सकाळी ८च्या सुमारास अचानक आग लागली. स्टेशन परिसर असल्याने येथे नागरिकांची वर्दळ होती. आग लागल्याचे दिसल्यानंतर परिसरात नागरिकांची तारांबळ उडाली. शेजारीच एटीएम व मोबाईलचे दुकान असल्याने ही आग आजूबाजूला पसरण्याची भीती व्यक्त होत आहे. या घटनेची माहिती वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना मिळाली. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. वसई विरारमध्ये गेल्या दोन दिवसांत आगीच्या दोन घटना घडल्या.

# पार्सल पकडल्याचे सांगून लाखांचा गंडा

**ठाणे :** इराणला पाठवलेले पार्सल पोलिसांनी पकडले असल्याचे सांगत ६ लाख ७४ हजार ५४१ रुपयांची रक्कम लाटणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरोधात नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.तक्रारदार राजस सुशील दळवी यांना शनिवारी त्यांच्या मोबाईलवर एका अज्ञात व्यक्तीचा फोन आला. तीने आपण फेडेक्स कुरियर मधून बोलत असल्याचे सांगून मुंबईवरून इराणला पाठवण्यात आलेले पार्सल पोलीसांनी पकडले असल्याचे सांगत लुबाडले.

# छताचे प्लास्टर पडून ठाण्यात एकजण जखमी

**ठाणे :** पूर्वेकडील कोपरी गावदेवी मंदिर परीसरातील ४० ते ५० वर्षे जुन्या शारदा भवन या तळअधिक तीन मजली इमारतीतील पहिल्या मजल्यावरील सदनिकेचे प्लास्टर कोसळून एक तरुण जखमी झाल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री घडली.

शैलेश शर्मा आणि बंधूंच्या मालकीची असलेल्या या इमारतीत एकूण २२ सदनिका असून स्ट्रक्चरल ऑडिट नंतरच इमारतीवरील कारवाई बाबत निर्णय घेतला जाईल. अशी माहिती घटनास्थळी भेट दिलेल्या पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, इमारतीच्या मालकांकडून इमारतीच्या दुरुस्तीबाबत अक्षम्य हेळसांड केली जात असल्याचा आरोप येथील सदनिकाधारकांनी केला. कोपरीतील गावदेवी मंदिरासमोरील चिंचोळ्या गल्लीत शारदा भवन ही ४० ते ५० वर्ष जुनी तळ अधिक तीन मजली इमारत आहे. मंगळवारी मध्यरात्री १२ च्या सुमारास पहिल्या मजल्यावरील श्रीमती सरोजिनी मुर्तूडकर यांच्या सदनिकेतील छताचे प्लास्टर कोसळले. यात अनिकेत मुर्तूडकर (२१) यांच्या पायाला किरकोळ जखम झाली. इमारतीत एकूण २२ सदनिका असून त्यातील १० ते १२ सदनिकांमध्ये प्लास्टरला व कॉलमला तडे गेल्याने रहिवासी धास्तावले आहेत. सद्यस्थितीत या सदनिकेत राहणाऱ्या तीनही रहिवाशांना बाहेर काढण्यात आले असून तात्पुरत्या स्वरुपात त्यांना दुसऱ्या ठिकाणी राहण्यास सांगितले आहे. घटनास्थळी पालिका बांधकाम विभागाचे उपनगर अभियंता व उपअभियंता, अग्निशमन दलाचे जवान, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, कोपरी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पाहणी केली.



# कारला अपघात, सळ्या घुसून टायर फुटला!

**नालासोपारा :** मुंबई-अहमदाबाद महामार्ग काँक्रीटीकरण कामादरम्यान ठेकेदाराने सुरक्षिततेच्या उपाय योजनांची अंमलबजावणी न केल्याने मंगळवारी सायंकाळी चिंचोटी येथे कारला अपघात झाला. सळया गाडीच्या टायरमध्ये घुसून टायर फुटला. गाडी रस्ता सोडून काँक्रिटीकरण होत असलेल्या बाजूला कलंडली. या गाडीत चालक, दोन महिला व नवजात बालक होते. सुदैवाने कुणालाही दुखापत झालेली नाही. या अपघाताची माहिती सुनील मिश्रा यांनी महामार्ग प्राधिकरणाला दिली. त्यानंतर अपघातग्रस्त गाडी टोईंग करून हा रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला. मात्र अपघाताने काँक्रीटीकरण निकृष्ट असल्याचे दिसून आले. आगामी काळात असे अपघात टाळता यावेत, यासाठी काम सुरू असलेल्या ठिकाणी सुरक्षितता उपाययोजनांची अंमलबजावणी केली पाहिजे. त्यासाठी मुंबई अहमदाबाद महामार्गाचे सेफ्टी ऑडिट करण्याची मागणी जोर धरत आहे. अनधिकृत पार्किंगवर तातडीने मार्ग काढावा. विशेष म्हणजे याच समस्येच्या अनुषंगाने घोडबंदर रोड ते डहाणूपर्यंतच्या महामार्गाची त्वरित दुरुस्ती करा, अशा सूचना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिलेल्या होत्या.




# लोकलमध्ये हाणामारी एकाचा मृत्यू; दोघांना अटक

**कल्याण:** लोकल ट्रेनमध्ये धक्का लागल्याने अथवा जागेवरून भांडणे होण्याचे प्रकार नेहमीच घडत असतात. मात्र क्षुल्लक कारणावरून एका गटाने दुसऱ्या गटाला केलेल्या बेदम मारहाणीत एका प्रवाशाला आपला जीव गमवावा लागल्याची घटना घडली आहे.दत्तात्रय भोईर (५५) असे मृत प्रवाशाचे नाव असून याप्रकरणी कल्याण रेल्वे पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे.

शहापूर तालुक्यातील साजिवली येथे राहणारे दत्तात्रय भोईर आणि प्रदीप सिरोशे हे २७ एप्रिल रोजी त्यांच्या दोन मित्रांसोबत उल्हासनगरमध्ये हळदी समारंभासाठी आले होते. कार्यक्रम आटोपून चौघांनी घराकडे परतण्यासाठी शहाड रेल्वे स्थानकातून शेवटची कसारा लोकल पकडली. आंबिवली स्थानकामध्ये चार जणांचा आणखी एक गटाने त्याच डब्यामध्ये प्रवेश केला.यानंतर दत्तात्रय भोईर आणि प्रदीप सिरोशे यांची त्यांच्या मित्रांसोबत थट्टामस्करी सुरू होती.पण ही मंडळी आपल्यालाच पाहून हसत असल्याचा गैरसमज दुसऱ्या गटाला झाला.ते आपल्यालाच चिडवत असल्याच्या गैरसमजातून सुरू झालेल्या वादातून एका गटाने दुसऱ्या गटावर कमरेचा पट्ट्याने व धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केला. यामध्ये दत्तात्रय भोईर आणि प्रदीप सिरोशे गंभीर जखमी झाले होते. त्यांना खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र गुरूवारी दत्तात्रय भोईर यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला.अमोल महावीर परदेसी ( ४०. रा. शहापूर ) आणि तनुज रवींद्रकुमार जम्मुवाल ( २१ रा. वशिंद )अशी हल्लेखोरांची नावे असून त्यांना रेल्वे पोलिसांनी अटक केली आहे.

# दुकानाचे शटर उचकटून गल्ल्यातील रोकड चोरली

**ठाणे :** ठाण्याच्या चरई परिसरातील कपड्याच्या दुकानाचे शटर कुलूप उचकटून अज्ञात चोरट्याने दुकानाच्या गल्ल्यातील रोकड लांबवली. ही घटना मंगळवार रात्री घडली.तुषार सुनिल यादव यांचे ठाण्यात चरई येथे कपडे विक्रीचे दुकान आहे. हिशोब करून दुकानाच्या गल्ल्यात १० हजाराची रक्कम ठेऊन दुकान बंद केले. बुधवारी सकाळी दुकानाच्या शटरचे कुलूप कोणीतरी तोडलेले आढळले. दुकान उघडल्यावर दुकानामधील कॅश काऊंटरमधील दहा हजाराची रक्कम चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले.नौपाडा पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ठाण्याच्या कोलशेत पसिरातील तीन तात्पुरत्या दुकानांना आग

**ठाणे :** ठाण्याच्या कोलशेत परिसरातील गादीचे दुकान, चहा आणि सलून अशा तात्पुरत्या स्वरूपात उभारलेल्या तीन दुकानांना आग लागल्याची घटना मंगळवारी पहाटे १ वाजण्याच्या सुमारास घडली. या आगीत कुणीही जखमी झालेले नाही. मात्र वित्तहानी झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. कोलशेत गावात तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेल्या तीन दुकानांना मंगळवारी पहाटे आग लागली होती. घटनास्थळी महावितरणचे कर्मचारी, कापूरबावडी पोलीस स्थानकाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी मदत करत आगीवर रात्री २-१० वाजण्याच्या सुमारास नियंत्रण मिळवले. आग लागलेल्या गादीच्या दुकानात कापसाच्या गाद्या, लाकडी खुर्ची, टेबल व इलेक्ट्रिक वायरिंग पूर्णपणे जळाली.

# ६.८४ लाखांचे वायर बंडल लांबवले

**ठाणे :** आयकीन ढोकाळी येथे युनिक इंजिनिअरिंग प्रा. लि. कंपनीने घेतलेल्या १२ इमारतींच्या वायरिंग कामासाठी आणलेल्या वायर बंडलपैकी ६ लाख ८४ हजाराच्या तांब्याच्या बंडल्स अज्ञात व्यक्तीने लांबवल्याची तक्रार सुपरवायझर आदित्य मणी त्रिपाठी(२९) यांनी कापूरबावडी पोलीस ठाण्यात नोंदविली आहे.

ढोकाळी परिसरातील आयकिन या गृहप्रकल्पाच्या टोलेजंग इमारतीच्या वायरिंगचे काम हे युनिक इंजिनिअरिंग प्रा. लि. कंपनीने सन २०२३ मध्ये घेतले होते. दरम्यान या वायरिंगच्या कामासाठी विविध गेजच्या तांब्याच्या तारा असलेले वायरिंगचे बंडल स्टोअरमध्ये ठेवलेले होते. कामासाठी लागेल तसे वायरचे बंडल रजिस्टरमध्ये नोंद करून घेतले जायचे. ८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९ च्या सुमर्स कंपनीचे स्टोअरकिपर रणजित कुमार यांनी तक्रारदाराला बोलावून स्टोअरमध्ये ठेवण्यात आलेले इलेक्ट्रिक सामान हे दिसून येत नाही. यावर तक्रारदार आदित्य याने साईट इन्चार्ज यांना बोलावून विचारणा केली. तेव्हा कल्पना नसल्याचे सांगितले. स्टोअरकीपरच्या खात्यात तब्बल विविध गेजचे तांब्याच्या तारा असलेले वायर बंडल अज्ञाताने लांबवल्याचे लक्षात येताच तक्रारदाराने कापूरबावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# महामार्गावरील तिहेरी अपघातात ट्रक चालकाचा मृत्यू

## नादुरुस्त कंटेनरला धडकले ट्रक-टेम्पो

**बोईसर :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील बंद कंटेनरला ट्रक आणि टेम्पोने धडक दिल्याने झालेल्या अपघातात ट्रकचालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. मुबिन अहमद (४३) असे ट्रकचालकाचे नाव आहे. मंगळवारी सकाळी झालेल्या तिहेरी अपघातात टेम्पो चालक गंभीर जखमी झाला असून, त्याला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी मनोर पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावर मंगळवारी सकाळी ६ च्या सुमारास आवंढाणी गावच्या हद्दीत कंटेनर नादुरुस्त झाल्याने मुंबई वाहिनीच्या पहिल्या मार्गिकेवर उभा होता. मुंबईच्या दिशेने जात असलेल्या भरधाव वेगातील ट्रकने कंटेनरला धडक दिली. तर ट्रकच्या पाठीमागून येत असलेला टेम्पो ट्रकला धडकून तिहेरी अपघात झाला. देखभाल दुरुस्तीचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून महामार्गावरील नादुरुस्त वाहने हटवण्याच्या कामात हयगय होत आहे.




# एमडी उत्पादन करणारा कारखानाच उद्ध्वस्त!

**ठाणे :** कासारवडवली पोलीस ठाण्यात एमडी तस्करीच्या दाखल गुन्ह्याचा तपास करताना गुन्हे शाखा युनिट-१ने थेट उत्तर प्रदेशमध्ये धडक देत एमडी उत्पादन करणारा कारखानाच उद्ध्वस्त केला. कोट्यवधींच्या अंमली पदार्थाच्या रॅकेटचा पर्दाफाश केल्याने पोलिसांचे कौतुक होत आहे.

चौकशीत विजय पाल व बिंदु यांचा शोध घेतल्यानंतर त्यांनी यूपीत एमडी उत्पादनाचा कारखानाच सुरू केल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने आजमगड येथे छापा टाकत सहा जणांना बेड्या ठोकल्या.कारखान्यातून २० कोटी १८ लाख, ४९ हजार ७१६ रुपयांचा एमडी अमली पदार्थ हस्तगत केला. कच्चामाल, साहित्य मोबाईल जप्त केले. सर्व तस्करांना ६ मेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. कारखान्यातून २५ ग्रॅम क्रिस्टल पावडर, केमिकल मिक्सकरून २० किलोपर्यंत अंमली पदार्थ तयार करण्याचे मिश्रण, साहित्य कच्चा माल, केमिकल मोबाईल फोन अन्य व्हावे असा २० कोटी १८ लाख ४९ हजार ७१६ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. या प्रकरणात आतापर्यंत १४ आरोपींना अटक करण्यात आली असून, एकूण ४८ कोटी १४ लाख १७ हजार ७९८ किमतीचा एमडी आणि एमडी बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल हस्तगत करण्यात असल्याची माहिती गुन्हे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी दिली.

# टिटवाळा, अंबरनाथ आणि वाड्यात वीज चोरी उघडकीस

**वसई:** एप्रिल महिन्यात महावितरणच्या टिटवाळा, अंबरनाथ पूर्व आणि वाडा उपविभागात वीज चोरांविरूद्ध धडक कारवाई करण्यात आली. टिटवाळा उपविभागात १२४ जणांविरूद्ध कारवाई करून ४१ लाख रूपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली. अंबरनाथ पूर्व उपविभागात मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करणाऱ्या १९ ग्राहकांकडे २६ लाख ३५ हजार रूपयांची वीजचोरी आढळून आली. तर वाडा उपविभागात तब्बल १०४ जणांविरूद्ध कारवाई करण्यात आली असून १ कोटी ९ लाख रूपयांची वीजचोरी उघडकीस आली आहे.

मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण परिमंडलात वीज चोरांविरूद्ध धडक कारवाई सातत्याने सुरू आहे. त्यानुसार टिटवाळा उपविभागातील जीआर नगर, बल्याणी गाव, आंबिवली रोड, वैष्णवी देवी चाळ, गुरू वली पाडा, शिवनगरी चाळ भागात एकाच दिवशी राबवलेल्या शोध मोहिमेत १२४ जणांकडे सुरू असलेल्या वीजचोऱ्या शोधण्यात यश आले.

या १२४ जणांकडून सुमारे ४१ लाख रूपये किंमतीची १ लाख ८० हजार ८८१ युनिट विजेची चोरी झाल्याचे उघडकीस आले आहे. उपकार्यकारी अभियंता गणेश पवार, सहाय्यक अभियंता तुकाराम घोडविंदे, कनिष्ठ अभियंते सचिन पवार, अलंकार म्हात्रे यांच्या पथकांने ही कारवाई केली.अंबरनाथ पूर्व उपविभागात ३३३७ ग्राहकांच्या वीज मीटरची तपासणी करण्यात आली. यात १९ वीज मीटरमध्ये फेरफार करण्यात आल्याचे आढळून आले. या १९ ग्राहकांनी २६ लाख ३५ हजार रूपये किंमतीची ९८ हजार ९९६ युनिट विजेची चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

अतिरिक्त कार्यकारी अभियंता जितेंद्र प्रजापती, सहाय्यक अभियंते वैशाली पाटील, प्रशांत नाहीरे, हरेश विशे, प्रतिक म्हात्रे, मोहित ठाकुर, रविंद्र नाहिदे, सहायक लेखापाल मयुरी बोरसे यांच्या पथकांनी ही कारवाई केली.

## वाडा उपविभागात तब्बल १०४ जणांविरूद्ध कारवाई




- तर वाडा उपविभागात वाडा शहर आणि ग्रामीण, गोऱ्हा, अंबाडी, कुडूस आदी भांगामध्ये राबवण्यात आलेल्या शोध मोहिमेत १०४ जणांकडे विजेचा चोरटा वापर आढळून आला. या १०४ जणंनी १ कोटी ९ लाख रूपयांची वीजचोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे.
- संबंधितांना चोरीच्या विजेचे देयक आणि तडजोडीची रक्कम भरण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या असून विहित मुदतीत या रकमेचा भरणा टाळणाऱ्यांविरूद्ध गुन्हे दाखल होण्यासाठी पोलिसांत फिर्याद देण्यात येणार आहे. वाड्याचे उपविभागीय अभियंता अविनाश कटकवार, सहायक व कनिष्ठ अभियंते, जनमित्र तसेच सुरक्षारक्षक यांच्या टिमने ही कामगिरी केली.

# पोलीस हवालदाराला मद्यधुंद तरुणाची मारहाण

**बोईसर :** मनोर-पालघर रस्त्यावरील मासवण पेट्रोलिंग करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर मद्यधुंद तरुणाने हल्ला केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शनिवारी रात्रपाळीच्या ड्युटी दरम्यान मासवन गावातील बँक ऑफ बरोडाच्या आवारातील क्यूआर कोड स्कॅन करण्यासाठी जात असलेल्या पोलीस हवालदार आयुब शेख यांच्यावर मद्यधुंद तरुणाने हल्ला करून मारहाण केली. याप्रकरणी मनोर पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून न्यायालयात हजर करण्यात आले आहे.

पोलीस हवालदार आयुब शेख शनिवारी रात्रपाळीच्या ड्युटीवर होते. रात्री १२.३०च्या सुमारास मनोर पालघर रस्त्यावरील मासवन गावाच्या हद्दीतील प्रिया पेट्रोलपंपावरील क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर बँक ऑफ बडोदाच्या परिसरातील क्युआर कोड स्कॅन करण्यासाठी जात होते. मासवन नागझरी रस्त्यावर वळण घेत असताना नाक्यावर एक कार समोर उभी राहिली. रस्ता अडवल्याने शेख यांनी कार बाजूला करण्याची विनंती केली होती. याचा राग आल्याने कारचालक गौरांग विशाल संखे याने शिवीगाळ सुरू केली. परंतु शेख यांनी ते पोलीस असल्याची माहिती देत शासकीय कर्तव्य बजावत असल्याचे सांगितते. त्यानंतरही संखे याने कार मधून लोखंडी पाईप काढत आयुब शेख यांना मारहाण केली. याप्रकरणी पोलीस हवालदार आयुब शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गौरांग संखे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संपादकीय

# ६५ व्या वर्षात पदार्पण




संपादक दिपक मोरेश्वर नाईक


महाराष्ट्राच्या निर्मितीचे शिल्पकार आणि पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी १ मे १९६० या दिवशी महाराष्ट्राच्या स्थापनेचा मंगल कलश आणला, त्याला साठ वर्षे उलटून गेली. चार वर्षांपूर्वी, १ मे २०२० या दिवशी, कोविड महामारीच्या सावटातही साधेपणाने महाराष्ट्राच्या स्थापनेचा हीरक महोत्सव साजरा झाला आणि देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतकाळ सुरू असताना, आता आपला महाराष्ट्र ६५ व्या वर्षात पदार्पण करत आहे. व्यक्तीच्या आयुष्यात, ६० वर्षांचा काळ उलटून गेला की, त्याच्या कर्तृत्वाचा लेखाजोखा घ्यायची योग्य वेळ आली असे समजतात. साठी उलटली की आपण कुठे होतो, कुठे आलो आणि कुठे पोहोचायचे याचे चिंतन आपोआपच सुरू होते. मागे वळून पाहिले जाते आणि आपण स्वत:सोबत जोडल्या गेलेल्या भूतकाळाचे पदर उलगडू लागतो. ह्या आठवणींची साठवण, हा आपला 'इतिहास' असतो. प्रत्येकाच्याच वाटणीला त्याचा त्याचा इतिहास आलेला असतो. एखाद्याच्या इतिहासाची पाने 'सुवर्णाक्षरां'नी लिहिलेली असतात, तर काहींच्या पानांवर नुसतेच, 'पांढऱ्यावर काळे' झालेले असते. ती पाने उलगडताना कुणाला समाधान, आनंद मिळतो, तर कुणी खंतावून जातो. तरीही आपण कोठे होतो आणि आज कोठे आहोत, याचे भान मात्र हीच पाने देत असतात. महाराष्ट्राच्या भूतकाळाचा, वर्तमानाचा आणि भविष्याच्या वाटचालीचा आढावा दर वर्षी या दिवसाच्या पूर्वसंध्येस घेणे आवश्यक असते. कारण उद्याच्या १ मे रोजी महाराष्ट्र आपल्या वयाची ६४ वर्षे पूर्ण करून पासष्टीत पदार्पण करणार आहे. काही दशकांपूर्वी राजा बढे यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्र गीता'ला आता राज्यगीताचा दर्जा मिळाला आहे, त्यामुळे या गीताचे सूर आजपासूनच राज्याच्या प्रत्येक कोपऱ्यात घुमू लागतील. महाराष्ट्र देशाला साद घालणारे मथळे माध्यमांवर झळकतील आणि समाजमाध्यमांवरील आभासी पाने महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा संदेशांनी ओसंडून वाहू लागतील. या दिवसाच्या इतिहासालाही महाराष्ट्रात मोठे महत्व आहे. काही वर्षांपूर्वी, जेव्हा महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवाचा सोहळा राज्यात पार पडला, तेव्हा संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी रक्त सांडणाऱ्या १०५ हुतात्म्यांच्या स्मृतिस्थळावर, राजधानी मुंबईतील हुतात्मा चौकातील हुतात्मा स्मारकावर, स्वातंत्र्य सैनिकांनी 'मातीच्या घागरी'तून राज्यभरातील नद्यांचे 'एकपणाचे पाणी' आणून ते हुतात्म्यांच्या स्मृतीचरणी वाहिले होते. दहा वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्र दिनाच्या आसपासही आजच्यासारखेच निवडणुकांचे वारे वहात होते. वातावरणात राजकारणाची वादळे घुमत होती आणि महाराष्ट्राच्या वर्तमान, भूतकाळ आणि भविष्यावर भाष्य करणाऱ्या घोषणांनी राजकारण तापले होते. काही जणांना 'महाराष्ट्र सर्वात पुढे आहे' असे वाटत होते, तर काही जण, 'महाराष्ट्राला कुठे नेऊन ठेवले' असा सवाल करत तेव्हाच्या सद्यस्थितीवर बोटे ठेवून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरत होते. त्याला आता दहा वर्षे लोटली. त्या प्रश्नांची किंवा महाराष्ट्राच्या सर्वात पुढे असण्याची चर्चा कालांतराने थंडावली, तरीही महाराष्ट्र हे पुरोगामी, प्रगत विचारांचे, उद्यमशील आणि रोजगाराभिमुख राज्य व्हावे ही सर्वांचीच इच्छा असल्याने, प्रगतीच्या वाटा आखण्याचा प्रयत्न मात्र प्रत्येकाने केला, यात दुमत असणार नाही. आता निवडणुकांचा काळ असल्याने, साजरेपणावर आचारसंहितेचे सावट असेल. प्रशासनाच्या पुढाकाराने सर्वत्र महाराष्ट्र दिन साजरा होईल आणि राज्याच्या प्रगतीचे पोवाडे वाजतील. कधीकाळी गिरण्यांच्या भोंग्यांनी जागा होणारा गिरणी कामगार, सवयीप्रमाणे सकाळी उठेल आणि हक्काच्या घरासाठी, वारसांच्या नोकऱ्यांच्या लढ्यासाठी बाहेर पडण्याऐवजी, 'कामगार दिन' साजरा करण्यासाठी घराबाहेर पडेल.

स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन वगैरे राष्ट्रीय सोहळे असले की कागदी किंवा प्लास्टिकचे 'तिरंगे' विकून चार पैशांची कमाई होते. आचारसंहिता असल्याने उद्याच्या 'महाराष्ट्रदिनी' झेंडे विकून पैसे मिळतील की नाही हे माहीत नसल्याने, रस्त्यावरची मुले सिग्नलवर नुसते हात पसरून याचना करू लागतील, पण सुट्टी असल्यामुळे 'रोजच्यासारखी' कमाई होईलच याची खात्री या मुलांना आज नसेल. फूटपाथवरच कुठे कुठे महाराष्ट्र दिनानिमित्त 'सत्यनारायणाच्या महापूजा' साजऱ्या होतील, घराघरांतील 'म्युझिक सिस्टीम'वर महाराष्ट्राचे पोवाडे वाजवतील आणि सुट्टीच्या दुपारी घराघरातल्या टीव्हीवर, मराठी चित्रपटांचा आनंद लुटून काही जण मराठी बाण्याला जागतील.

खरे म्हणजे राज्याचा आयुष्यात ६४ वर्षांचा काळ म्हणजे काही 'इतिहास' ठरावा इतका जुना काळ नाही. गेल्या साडेसहा दशकांत महाराष्ट्राने अनेक चढ-उतारही पाहिले, असंख्य संकटे झेलली. असंख्य डोळ्यांचे अश्रू अजूनही खळलेले नाहीत. काही संकटे निसर्गाने लादली, तर काहींना आपणच निमंत्रण दिले. महाराष्ट्रावर बॉम्बस्फोटाच्या जखमा आहेत, गिरणी संपात उद्ध्वस्त झालेल्या लालबाग-परळच्या कुटुंबाच्या वाताहातीच्या कहाण्या आहेत, मराठी-अमराठी वादातून भडकलेल्या हिंसाचाराच्या खुणा आहेत, दलित-सवर्ण संघर्षातून उमटलेल्या वेदना आहेत आणि कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरातले अश्रू सांडलेले आहेत. भूकंपाने झालेली हानी भरून न निघाल्याने, दरडी कोसळून ढिगाऱ्याखाली घरे गाडली गेल्यामुळे, महापुरात घरे वाहून गेल्यामुळे आणि अशा असंख्य कारणांमुळे गेल्या दशकाहून अधिक काळापासून बेघर जिणे जगणाऱ्या कुटुंबाचे भेदक वास्तव आहे; तर जातीय दंगलीत होरपळलेल्यांचे भेदरलेले अस्तित्वही या काळावर उमटून राहिलेले आहे. नोकरीच्या 'निमंत्रणा'कडे वर्षानुवर्षे लागून राहिलेले डोळेदेखील महाराष्ट्र दिनाचा सोहळा कौतुकानेच न्याहाळणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, ज्ञानेश्वर-तुकाराम, शाहू-फुले-आंबेडकर आदी अनेक महापुरुषांनी महाराष्ट्रात जन्म घेतला, म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासाची पाने सोनेरी झाली आहेत. त्या चमकदार इतिहासामुळे गेल्या साडेसहा दशकांच्या वाटचालीचे 'पांढऱ्यावरचे काळे'देखील उजळले आहे. यामुळेच अनेक संकटे झेलूनही आपण सर्वात पुढे आहोत. देशात सर्व आघाड्यांवर आघाडीवर आहोत, म्हणून महाराष्ट्राचे कौतुक करायलाच हवे, महाराष्ट्र गीताचे बोल घुमायलाच हवेत!

# नेत्यानाहू विरुद्ध लोकक्षोभ

हमासविरुद्धच्या युद्धाने आधीच अडचणीत असलेल्या इस्त्रायलमध्ये सरकारच्या न्यायिक योजनेविरोधात लोक आंदोलन पुन्हा डोके वर काढण्याच्या बेतात आहे. अगोदरच्या आंदोलनात पाच लाख लोकांनी भाग घेतला होता. बेंजामिन सरकारने ते आंदोलन थांबविले होते. युद्धाच्या काळात अशा आंदोलनावर बंदी होती. परंतु, आता पुन्हा आंदोलक एकत्र येत आहेत. त्याचे कारण काय असेल तर काही इस्त्रायल ओलीसांच्या मृत्यूनंतर त्यांचे शव राष्ट्रीय सैन्याला परत करण्यात आले. ही बातमी हा-हा म्हणता इस्त्रायलमध्ये पसरली आणि संवेदनशील लोकांनी राजधानीत रस्त्यावर येऊन प्रचंड निदर्शने सुरू केली आणि नेत्यानाहू यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

नेत्यानाहू यांनी घेतलेले निर्णय, त्यांनी घेतलेला युद्धाचा पवित्रा आणि त्यांनी केलेले अन्याय, अत्याचार याला जनता किती उचलून धरेल किंवा किती विरोध करेल हे इस्त्रायलच्या आगामी निवडणुकीत दिसून येईल. परंतु, तूर्त त्यांच्याविरुद्ध प्रकट झालेला लोकक्षोभ त्यांच्या अप्रियतेचे एक उदाहरण म्हणावे लागेल.

इस्त्रायलचे पंतप्रधान नेत्यानाहू आता आतून आणि बाहेरून चांगलेच कोंडीत सापडले आहेत. ते चक्रव्यूहातून कसे बाहेर पडतील हे पाहणे रंजक ठरणार आहे. एकीकडे दीर्घकाळ अमेरिका पाठिशी होती. परंतु, आता त्याच अमेरिकेने शांततेचे तुणतुणे लावले आणि इस्त्रायलवर दबाव आणला की, सैन्य मागे घ्या, नाही तर जग तुम्हाला एकटं पाडेल. जगाच्या राजकारणात संघटित इस्लामी देशांच्या दबावापुढे अखेर अमेरिकेनेही नमते घेतले आहे आणि इस्त्रायलला सबुरीचा सल्ला दिला. त्यामुळे इस्त्रायलला आपले सैन्य गाझामधून माघार घेणे अपरिहार्य झाले होते. तिकडे शांततेची बोलणी चालू आहेत, वाटाघाटी सुरू आहेत. अखेर इस्त्रायलने उसंत घेतल्याने युद्धाची तीव्रता हळूहळू कमी होत आहे. ही गोष्ट गाझापट्टीच्या दृष्टीने, शांततेच्या दृष्टीने सकारात्मक आहे. उदध्वस्त झालेल्या गाझापट्टीचे पुनर्वसन कसे होणार हा खरा प्रश्न आहे. पॅलेस्टाईनचे एवढे नुकसान झाले आहे की, ते भरून निघणे फार कठीण आहे. खरे तर पॅलेस्टाईनचा काय दोष असा प्रश्न पडेल. परंतु, पॅलेस्टाईनमध्ये वाढलेल्या हमास या दहशतवादी संघटनेने इस्त्रायलवर हल्ला केल्यामुळे त्या भूमीवर प्रतिहल्ला होणे ही गोष्ट सहाजिक आहे. पण, एखादा देश जेव्हा दहशतवादी संघटन पोसतो, तेव्हा त्या दहशतवादी संघटनेच्या अतिरेकी कारवायांचे दुष्परिणाम त्या देशावरही होतात, याचे पॅलेस्टाईन हे उत्तम उदाहरण आहे. हमासने मध्यरात्री चढवलेला हल्ला खरोखर पॅलेस्टाईनच्या पाठिंब्याचा होता का, त्याला किती देशांचा पाठिंबा होता आणि या प्रकारची कारवाई, प्रतिकारवाई या गोष्टी मानवी जगण्याच्या दृष्टीने किती योग्य आहेत, असे अनेक प्रश्न त्यातून उभे राहतात. पण, हमासच्या अत्याचाराचे समर्थन करता येणार नाही. त्याला इस्त्रायलने उत्तर दिले, पण ते उत्तर तितके दीर्घकाळ चालावे असे नव्हते. इस्त्रायलनेसुद्धा टोकाची भूमिका घेतली; त्याचीही जगभर चिंता व्यक्त करण्यात आली.

इस्त्रायलच्या सैन्याने मोठ्या प्रमाणावर माघार घेतली, त्याचे जगभर स्वागत करण्यात आले. इस्त्रायलचे सैन्य आणि सरकारला माघारीचे फारसे महत्त्व नसल्याचे दिसते. मोठ्या अनिच्छेनेच त्यांनी माघार घेतली असावी असे म्हटले जाते. व्यापक अर्थाने चाललेल्या या संघर्षाचे अनेक पदर आहेत. उजव्या विचाराचा इस्त्रायल आयोम (आयओएम) मध्ये काय म्हणतो, उजव्या



विचाराचे राजकीय प्रतिनिधी एरियल कहाना यांनी चर्चेच्या ताज्या फेरीत हमासची युद्धविराम करारावर सहमती देण्यासाठी, इस्त्रायल सरकारवर दबाव आणण्यासाठी अमेरिकेसारख्या देशानी त्यांना प्रभावित केले आणि अखेर सैन्याच्या माघारीचा निर्णय इस्त्रायलला घ्यावा लागला. युद्ध थांबविण्यासाठी इस्त्रायल प्रवक्त्यांनी देऊ केलेली औपचारिक कारणे मोठी अर्थपूर्ण आहेत. प्रत्येक हुशार व्यक्ती हे पाहू शकतो की, जेव्हा योग्य वेळ येते तेव्हा योग्य पाऊल टाकावे लागते. आज इस्त्रायलने माघार घेतली असली तरीदेखील हे युद्ध थांबेल किंवा थांबले असे वाटत नाही. कारण जोपर्यंत कायमस्वरुपी तोडगा निघत नाही, तोपर्यंत हा संघर्ष अटळ आहे. भविष्यकाळात दोन्ही शेजाऱ्यांमध्ये सहमतीचा करार होत नाही तोपर्यंत संघर्ष, ताणतणाव, हल्ले, प्रतिहल्ले या गोष्टी होतच राहतील. खरे तर इस्त्रायलने पॅलेस्टाईनचे अस्तित्व मान्य करावे. त्यांना किती भूप्रदेश द्यायचा हे जगाने ठरवावे. संयुक्त राष्ट्रसंघाने या तिनही पक्षांची बैठक घ्यावी. खुद्द इस्त्राईल, पॅलेस्टाईन आणि शेजारी राष्ट्रांचे प्रतिनिधी यांनी एकत्र बसावे. युद्ध, अपरिमित हानी, जीवितहानी, वित्तहानी हे सारे टाळावे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव अधिकार तज्ज्ञांच्या मते, गाझामधील परिस्थिती म्हणजे एक मानवनिर्मित आपत्ती आहे. या दुष्काळातून सामान्य माणसाला कसे मुक्त करावयाचे हा खरा प्रश्न आहे. विस्कटलेले पॅलेस्टिनी नागरिकांचे जीवन सुधारण्यासाठी, त्यांच्या कल्याणासाठी, त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आपणास आता अन्नधान्याचा पुरवठा तसेच आरोग्य, सेवा सुविधा यांच्या मदतीची गरज आहे. हे सर्व करण्यासाठी इस्त्रायलवरसुद्धा दबाव वाढतो आहे. संयुक्त राष्ट्रसंघाचे हे जसे कर्तव्य आहे, तसे जगातील प्रगत देशांचेसुद्धा कर्तव्य आहे. अमेरिकेतील वरिष्ठ मानवाधिकार कार्यकर्ते वोल्कर टर्क यांनी म्हटले आहे की, या सर्व बाबतीत इस्त्रायलवर अनेक पैलूंनी दोष दिला जातो आहे. इस्त्रायलने पॅलेस्टाइनविरोधात युद्धाचे शस्त्र तर उपसले, पण त्याबरोबर उपासमारही लादली आहे. संयुक्त राष्ट्राचे उच्चाधिकारी टर्क यांच्या मते, जर इस्त्रायलचा हेतू अनिष्ट होता हे सिद्ध झाले तर तो त्यांचा युद्ध गुन्हा ठरू शकेल. थोडक्यात, बेंजामिन नेत्यानाहू यांच्या राजकारणाने एका अर्थाने इस्त्रायलची बदनामी तर झालीच, शिवाय एक राजकारणी म्हणून त्यांचे किती बरोबर आहे, किती चुकले आहे हे आता तेथील जनता ठरवेल. त्यांच्या चुकीला संपूर्ण मूर्खपणा म्हणता येईल का हा वादाचा विषय आहे. परंतु, पुढे येणाऱ्या निवडणुकीत इस्त्रायलमधील जनता नेत्यानाहूंना त्यांची जागा दाखवून देईल काय? काहींच्या मते, इस्त्रायलचे जनमत विभागलेले आहे, त्यामुळे नेत्यानाहू आपली प्रतिमा उजळ करण्यासाठी आता भविष्यकाळात कोणते निर्णय घेतील, कोणती पावले टाकतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आपले अंगीकृत उद्देश साध्य झाल्यानंतर माघार घेतात आणि पवित्रे बदलत राहतात, विषयांतर करत राहतात. त्याप्रमाणे नेत्यानाहू आता गाझापट्टीतून माघार घेतल्यानंतर आपला राजकीय पवित्रा काय घेतील व भविष्यासाठी आणि अस्तित्वासाठी काय करतील याकडे सर्व जगाचे लक्ष लागले आहे. नेत्यानाहू यांनी आपल्या निवेदनातून आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, त्यांनी वास्तवात जमिनीवर राहून विचार करावा, तरच प्रश्न सुटू शकतील, ते गुंतागुंतीचे होणार नाहीत. प्रश्न एकट्या नेत्यानाहू यांचा नाही किंवा इस्त्रायलचा नाही. सर्व मानवजातीच्या कल्याणाचा आहे, हीच गोष्ट खरी आहे. गाझाला आता पुनर्वसनाची गरज आहे. गाझाला आता जखमा मिटवण्याची गरज आहे. जुन्या आठवणी काढून पुन्हा दुःखात विव्हळत राहण्यात अर्थ नाही. साधनसामुग्रीचा दुष्काळ नाहीसा करून आता सुसंवादाचा सुकाळ कसा होणार, यावर पॅलेस्टाईनचे भवितव्य अवलंबून आहे. पुनर्वसन सोपे नाही, कठीण आहे. अनेक संकटांनी आणि अडचणींनी भरलेले आहे. पण, कुठल्याही देशाच्या इतिहासात मागील घटना विसरून जाऊन नव्याने सुसंवाद करावा लागतो; तरच इतिहासाचा अर्थ त्या देशाला आणि शेजाऱ्यांनाही कळला असे म्हणता येईल.

# दुधासाठी दहा हजार उंटांचा गोठा

उंट या प्राण्याचा अवतार पृथ्वीवर कधी झाला आणि तो जगाच्या वाळवंटी भागात पाळीव प्राणी म्हणून केव्हापासून आहे हे बघण्याऐवजी हा प्राणी 'वाळवंटातील जहाज' म्हणून मान्यता पावला हे आज महत्त्वाचे ठरू शकेल. कारण उंट या प्राण्याला माणसाने कामाला तर लावले आहेच, पण आता माणूस त्याला 'गाय' बनवून चक्क उंटाच्या दुधासाठी दहा हजार उंट एकत्र राहू शकतील असे प्रचंड गोठे निर्माण करू लागला आहे, ही माणसाच्या विज्ञानाची अधोगती म्हणावी की दूध देणारे इतर काही प्राणी जगाला भीती दाखवणाऱ्या हवामान बदलात मिथेन नावाच्या वायूची निर्मिती करतात म्हणून असावे? परंतु, उंट मात्र त्यापासून बरेच दूर आहेत. गाय आणि बकरी तसेच आणखी काही प्राणी खास करून दुधासाठी पाळले जात असले तरी उंट हे त्या मानाने कमी प्रमाणात आणि केवळ मध्य-पूर्वेच्या काही भागांत दुधासाठीही पाळले जात होते. या दुधात पेशींची झीज थांबवू शकणारे अनेक प्रकारचे पौष्टिक घटक असतात. या दुधात इन्सुलिनसारखी प्रथिनेदेखील आढळतात. या दुधात गायीच्या दुधापेक्षा अधिक 'क' जीवनसत्व आणि लोह असते, त्यामुळे ते चवीला नेहमीच्या दुधापेक्षा काहीसे अधिक खारट लागते. आजवर उंट हे दुधाच्या उद्योगापासून दूर ठेवले गेले होते, पण माणसाने आता हवामान बदलाचे कारण देऊन त्यांना यात आणले आहे. उंट हे त्यांच्या उत्क्रांतीपासूनच अतिशय उष्ण दिवस आणि गोठवणाऱ्या थंड रात्री यांच्याशी जुळवून घ्यायला तयार झाले होते. अनेक दिवस आहार किंवा पाण्यावाचून राहणे त्यांनी शक्य करून घेतले होते. या सर्व कारणांमुळे हे नव्या अन्न प्रणालीच्या कार्यक्रमात महत्वाची भूमिका बजावू शकणार आहेत. आजच्या भांडवलशाहीने हीच कारणे पुढे करून व्यवसायवाढीसाठी एक उत्तम प्रकार म्हणून उंटाच्या दूध विक्रीचा घाट घातला आहे असे दिसते. हा उद्योग आताच फोफावू लागला आहे. ग्रामीण अरेबियन भाग आणि मध्य आशियामध्ये उंट-शेतीचे कारखाने सुरू झाले, तर त्यातून पर्यावरणासाठी एक नवी डोकेदुखी निर्माण होणार आहे. कारण पारंपरिक पद्धती यामुळे मागे पडतील, असे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे. संबंधितांनी यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली असून या दुधाची वैशिष्ट्ये पुढे करून त्यासाठी मागणी वाढवण्याचे काम सुरू झाले आहे. गोबी आणि ओमान यांच्या वाळवंटी प्रदेशात ताजे उंटाचे दूध विकले जाते आणि त्याचा उपयोग चहातदेखील केला जातो. उंटाच्या दुधाचे दही अधिक काळ चांगले राहू शकते. भारततही उंटाचे दूध मिळू शकते, मात्र ते इतर प्रदेशांच्या मानाने अधिक फेसाळ असते; याचे कारण उंटांची जात हे असू शकेल.

# लोकशाही डिस्टिंक्शनमध्ये येण्यासाठी...

प्रस्तुत मालिकेत यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या एका लेखात माहीतगार किंवा समजदार मतदार अर्थात इन्फॉर्म्ड वोटर या संकल्पनेवर लिहिले होते. भारताच्या दृष्टीने ही कल्पना पुरेशी परिचित नाही. तरीही वाचकांनी फोनवरून, मेसेज पाठवून, प्रत्यक्ष भेटून आपल्या प्रतिक्रिया दिल्या. भावना व्यक्त केल्या. लोकांना या विषयावर अधिक समजून, जाणून घ्यायचे आहे असे मला त्या लेखावरील प्रतिसादादरम्यान वाटले. त्या विषयावर सविस्तर लिहिण्याचा योग कधी तरी येईल अशी अपेक्षा करतो. आता लोकसभा निवडणुकीचा पहिला, दुसरा टप्पा आटोपला आहे. आणखी महिनाभर अनेक टप्प्यांत ही निवडणूक होत राहील. ४ जूनला निकाल आहे. तोवर सर्वांनाच प्रतीक्षा करणे भाग असले तरी सर्व प्रकारचे आणि सर्व स्तरीय प्रयत्न होऊनदेखील मतदानाचा टक्का कमी का, याचे ठोस उत्तर मिळालेले नसून, तेच शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे.

शंभर टक्के मतदान कधीही होऊ शकत नाही, हे आपण मान्य केले पाहिजे. पण, जेमतेम अर्धे म्हणजे पन्नास-पंचावन्न टक्के मतदान होणे आपण मान्य करावे का, हा खरा प्रश्न आहे. पहिल्या टप्प्यात पन्नास ते पंचावन्न टक्के मतदान झाले. निवडणूक आयोग, केंद्र व राज्य सरकार, राजकीय पक्ष, उमेदवार, राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, स्वयंसेवी संघटना अशा सर्व स्तरावर मोहिमा राबवूनदेखील मतदानाचा टक्का वाढताना दिसत नाही. लोकतांत्रिक समाजात निवडणुका किंवा मतदान हे प्रशासन व्यवस्थेतील नागरी सहभागाचे प्रतीक मानले जाते. नागरिकांना मतदानाचा हक्क बजावण्याची आणि राष्ट्राचे भविष्य घडवण्याची संधी त्यातून मिळते. तथापि, अलीकडच्या काळात एक नवाच कल उदयास आला आहे. हा कल विशेषतः शहरांमध्ये आहे आणि तो आहे, कमाल मतदानाची अपेक्षा असताना कमीत कमी मतदान होण्याचा!

या संदर्भात विचार करताना एक घटक सर्वप्रथम लक्षात येतो तो असा की, एकूण राजकीय व्यवस्थेबद्दल लोक नाराज आहेत. असंतुष्ट आहेत. त्यांच्या मनात अस्वस्थता आहे. आता ती वाढत चाललेली आहे. परवा एक जण भेटला. पक्का सेक्युलर विचारांचा बोलघेवडा माणूस. पेशंट म्हणून आला होता. निवडणुकीवर चर्चा निघाली. त्याने मतदान केले नव्हते. मी त्याला कारण विचारले तर म्हणाला की, मी कुणालाही मतदान केले किंवा कुणालाच केले नाही तरी काय फरक पडतो? काहीच नाही! निवडणूक होणार, निकाल लागणार आणि मग आयाराम-गयारामचा खेळ होणार. आपल्या मताला काहीच किंमत नसेल तर कशाला धडपड करायची? त्याच्या उत्तरातील प्रश्नचिन्हांची अनेक उत्तरे देता आली असती, पण ते मी टाळले. असा सरधोपट विचार कामाचा नाही. पण, आम नागरिक अस्वस्थ आहे, गोंधळलेला आहे हे मात्र खरे. मला तसे मनापासून वाटत होते. त्याची पडताळणी अनेकांशी बोलल्यावर झाली. राजकीय व्यवस्थेबद्दलचा भ्रमनिरास हे कमी मतदानाचे प्राथमिक कारण असावे, या निष्कर्षाप्रत येण्यास जागा आहे. मतदानाचे महत्त्व लोकांना कळते. अधिकार आणि जबाबदारीही कळते. पण, त्यात पावित्र्य किंवा निर्णय प्रक्रियेतील सहभागासारखे काहीही राहिलेले नाही, याचा अंदाज लोकांना आला आहे. अनेक नागरिकांना लोकतांत्रिक निर्णय प्रक्रियेपासून आपण डिस्कनेक्टेड आहोत असे वाटते. आपल्या देशाचे लोकतांत्रिक भविष्य सुनिश्चित करण्यात आणि त्यातही राज्यकर्ते निवडण्यात आपल्या वैयक्तिक मताचे फारसे महत्त्व नाही, असेही लोकांना वाटते. ही भावना आयाराम-गयाराम, खोके-पेट्यांची जाहीर चर्चा आणि राजकारण्यांचा संधीसाधूपणा यामुळे वाढलेली आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पावित्र्यावरील विश्वासाला धक्का पोहोचला आहे. आपण मत दिले नाही तरी काही फरक पडत नाही आणि एखाद्याला मत दिले तरी तो दलबदलूपणा करणार नाही, याची कोणतीच खात्री नाही. त्यामुळे लोकांमध्ये मतदानाच्या संदर्भात उदासिनता आहे. लोकशाहीतील नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व मूलभूतपणे समजून घेतल्याशिवाय आणि त्यासाठी वेगळे प्रयत्न केल्याशिवाय आपण मतदानाचे प्रमाण वाढवू शकत नाही.

राजकीय डावपेचांचा भाग म्हणून एखाद्या वर्गाचे मतदान एखाद्या विशिष्ट उमेदवाराकडे वळविणे, एखाद्या वर्गाला मतदानापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करणे हे सारे घडत असते. त्यात अस्वाभाविक असे काहीही नाही. मात्र, एकूण समाज म्हणून शंभरातल्या फक्त पन्नास लोकांनाच मतदान करावेसे वाटते, यात डावपेचाचा भाग असू शकत नाही. हा परिणाम असलाच तर एखाद्या गोष्टीबद्दलच्या भ्रमनिरासाचाच असू शकतो. निवडणुकांमध्ये पूर्वीही भ्रष्टाचार, पैशांची देवाणघेवाण या गोष्टींची चर्चा होत असे. आताही ती तशी होते. आपली लोकशाही अमृत महोत्सवात आहे. आपला समाज राजकारणाविषयी सजग आहे. मात्र, तो मोठ्या प्रमाणात मतदान करीत नाही. जागतिक आकडेवारी असे सांगते की, केवळ २० टक्के देशांमध्ये ऐंशी टक्के किंवा त्यापेक्षा अधिक मतदान होते. मतदानाचा घसरता टक्का हा संपूर्ण लोकतांत्रिक जगाच्या चिंतेचा विषय आहे. लोकांना एका वर्षात किती वेळा मतदानाला जावे लागते, इथपासून ते आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीने काय केले, इथवर अनेक मुद्दे मतदानाची इच्छा व कृती या संदर्भात चर्चिले जातात. पण, त्याहून महत्त्वाचे असे की, आपल्या लोकतांत्रिक व्यवस्थेतील काही गंभीर दोषांचा हा परिणाम आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. माझ्या आकलनाप्रमाणे लोकतांत्रिक किंवा राजकीय निर्णय प्रक्रियेच्या अनुषंगाने आपल्या मताला काही मोल किंवा महत्त्व आहे, असा विश्वास फार कमी मतदारांना उरलेला आहे आणि त्यामुळे मतदानाचा टक्का घसरला आहे. व्यवस्थेची दिशा ठरवणाऱ्या लोकतांत्रिक प्रतिनिधित्वाचे प्रतीक म्हणून राजकीय पक्षांची काही भूमिका आहे, याबद्दलही लोकांच्या मनात शंका आहे. एकीकडे लोक राजकारणाविषयी जोरात चर्चा करतात, बातम्यांवर चर्वणे करतात. पण, ते पुरेशा प्रमाणात मतदान करीत नाही, या दोन बाजू लक्षात घेऊन आता काही तरी उपाययोजना झाली पाहिजे. ती प्रामुख्याने शालेय स्तरापासून सुरू होऊ शकते. शालेय मुलांना आपण स्वच्छतेचे महत्त्व सांगतो, तसेच मतदानाचे महत्त्व समजावून सांगणारा कंटेन्ट अभ्यासक्रमात असला पाहिजे. महाविद्यालयीन स्तरावर या विषयावर मंथन झाले पाहिजे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्था लोकशाही तत्त्वे आणि नागरी सहभागाचे महत्त्व समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. असे अनेक उपाय करून लोकशाहीसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या निवडणूक व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास पुनःप्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. निवडणूक घेणाऱ्या यंत्रणेची विश्वासर्हता निर्विवाद असणे आणि राजकीय पक्षांनी-नेत्यांनी सार्वजनिक जीवनात (किमान) शुचितेचा अवलंब करणेही यासंदर्भात महत्त्वाचे आहे. एक आणखी सूचवावेसे वाटते. आपले सरकार इज ऑफ डुईंग बिझनेसची चर्चा करीत असते, त्यासाठी प्रयत्न करीत असते. आपण इज ऑफ वोटिंगसाठी असे काही करू शकतो काय, याचा विचार केला पाहिजे. शेकडो कोटी रुपयांचे व्यवहार सुरक्षित पद्धतीने ऑनलाईन होत असतील तर मतदानासाठी एखादा असा इंटरफेस तयार करणे अशक्य आहे, असे वाटत नाही. हे सारे केले पाहिजे ते यासाठी की, शंभर टक्के मतदान शक्य नसले तरी तेच आपले सर्वांचे टार्गेट असले पाहिजे. त्याशिवाय मतदानाचे प्रमाण वाढणार नाही आणि जोवर मतदानाचे प्रमाण समाधानकारकरीत्या वाढत नाही, तोवर लोकशाही व्यवस्थेतून जन्माला येणाऱ्या समाधानावरही मर्यादा असतील. एका वाक्यात सांगायचे तर मतदान डिस्टिंक्शनच्या लेव्हलवर म्हणजे ७५ टक्क्यांहून अधिक झाले तर ते लोकतांत्रिक व्यवस्थेतून लोकांच्या वाट्याला येणाऱ्या समाधानाच्या पातळीत निश्चित वाढ करणारे असेल. म्हणजे लोकशाही डिस्टिंक्शनमध्ये येईल. अल्प मतदानातले असमाधान आपण अनुभवत आहोतच!

# दलिया उपमा

**डब्याला देण्यासाठी हा एक चविष्ट आणि पौष्टिक खाद्यपदार्थ. या उपम्यामध्ये तुम्हाला डाळी आणि भाज्याही घालता येतील.**




**साहित्य :** १ वाटी दलिया, बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो, पाव वाटी (गाजर + मटार + फ्लॉवर + सिमला मिरची + फरसबी बारीक चिरून) मूगडाळ पाव वाटी, चवीनुसार मीठ, साखर.

**फोडणीसाठी :** तूप, मोहोरी, हिंग, हळद, कढीपत्ता, हिरव्या मिरच्या, आले, लाल मिरच्या.

**पाककृती :** कोरडा दलिया लालसर होईस्तोवर भाजून घ्यावा. तुपाच्या फोडणीत मोहोरी, हिंग, हळद, कढीपत्ता हिरव्या मिरच्या, आले घालावे. ही फोडणी छान बसल्यावर त्यात कांदा, टोमॅटो परतून घ्यावा. मग भाज्या परताव्या. त्या थोड्या शिजल्यानंतर डाळ घालून हळद घालावी आणि परतावे. सर्वात शेवटी दलिया घालावा. दलियाच्या दोन ते अडीच पट गरम पाणी घालावे. मीठ, साखर घालून मंद आचेवर शिजवावे. हा शिरा अगदी गोळाही होणार नाही आणि अगदी कोरडाही होणार नाही, अशा प्रकारे वाफेवर शिजवून घ्यावा.

# परीक्षेवेळी काय खावे काय नाही, जाणून घ्या?

**परीक्षेचे** दिवस चालू आहेत अशात भूक-तहान विसरून अभ्यास करत राहणे आरोग्यासाठी हानीकारक आहे. यावेळी योग्य आहार घेतला पाहिजे. या दिवसांमध्ये फास्ट फूड खाणे टाळा. याने चित्त एकाग्र होण्यास मदत होईल. लिक्विड पदार्थांचे सेवन करावे.



▮ हेल्थी फूडने स्मरण शक्ती वाढते. त्यामुळे कोलेस्ट्रॉलची मात्रा कमी असलेले फूड सेवन करावे.

▮ खाण्यात अंतर कमी असला पाहिजे. अधून-मधून दाणे, मखाणे, चणे, पॉपकार्न असे पदार्थ एक-दोन तोंडात टाकत राहावे.

▮ या दिवसांमध्ये दूध, दही, अंडी भरपूर मात्रेत घ्यावे.

▮ घरी तयार केलेली भेल, टोस्ट, पनीर, सलाड, मध, सुखे मेवे सेवन करावे.

▮ चहाऐवजी फळांचा रस, लिंबू पाणी घेणे योग्य राहील. चहाची सवय असेल तर हर्बल टी घेणेही फायद्याचे ठरेल.

▮ लंचमध्ये कडधान्य, सलाड, विविध डाळी आहारात सामील करायला हवं.

▮ रात्रीच्या वेळी सांजा, कॉर्न किंवा साधी फोडणी दिलेली भाजी-पोळी खाणे योग्य ठरेल.

# झोपेत होणारे केसांचे नुकसान टाळण्यासाठी खास एक्सपर्ट टीप्स!

**रात्री झोपताना नेमके केस मोकळे ठेवून झोपावे की बांधून? हा प्रश्न अनेकींना पडतो. रात्री झोपेत केसांमध्ये गुंता होतो आणि सकाळी तो सोडवताना नुकसान होण्याचे प्रमाण अधिक वाढते. मग केसांचे आरोग्य जपण्यासाठी नेमकी कशी काळजी घ्यावी याकरिता ब्युटी आणि हेअर एक्सपर्टने दिलेल्या या खास टीप्स...**

▮ ४-५ थेंब लेमनग्रास ऑईल हातावर घेऊन केसांना टोकांशी लावा आणि त्यानंतर केसांचा अंबाडा बांधून झोपा. लेमनग्रास ऐवजी तुम्ही पेपरमिंट ऑईल वापरू शकता. यामुळे केसामधील शुष्कता आणि टोकांना होणारे नुकसान कमी होण्यास मदत होते.

▮ केस मोकळे ठेवून झोपणे अनेकांना त्रासदायक वाटते. यामुळे साहजिकच केसांचे नुकसान अधिक प्रमाणात होते. मग अशावेळी तुमचे केस सरळ असतील तर हलकेच पोनिटेल बांधून झोपा. म्हणजे सकाळी उठल्यावर ते फ्रिजी होणार नाहीत. तुमचे केस लांबसडक असतील तर त्याचे हलकीच वेणी बांधा. म्हणजे ते गुंतणार नाहीत. तसेच तुमचे केस कुरळे असतील तर डोक्यावर अंबाडा बांधून झोपा. मात्र केस बांधताना इलॅस्टिकचा हेअर बॅण्ड वापरू नका. यामुळे केसांवर विनाकारण ताण येण्याची शक्यता असते.





▮ रात्री झोपायला जाण्यापूर्वी केस नीट विंचरा. त्यासाठी मोठ्या दातांची फणी वापरा. केसांच्या मुळांपासून टोकापर्यंत केस योग्यरीत्या विंचरा. यामुळे टाळूवर निर्माण होणारे नैसर्गिक तेल टोकांपर्यंत नीट पोहोचेल.

▮ रात्री झोपताना केस सिल्कच्या किंवा मऊ कापडामध्ये गुंडाळून झोपा. दुसऱ्या दिवशी सकाळी केस मोकळे करा. यामुळे केसांचे नुकसान टाळण्यास मदत होईल.

▮ ओले केस असताना झोपू नका. ते पुरेसे कोरडे करा. अन्यथा ते गुंतण्याची शक्यता अधिक असते.

▮ उशीचे कव्हर कॉटनची असल्यास ती बदलून सिल्क किंवा सॅटीनच्या कापडाची बनवा. कॉटन कापडामधून मॉईश्चरायझर शोषले जाते. तसेच गुंता वाढतो. सिल्कच्या मऊ कापडामुळे मॉईश्चरायझर शोषले जात नाही.

# पायांची दुर्गंधी कमी करण्यासाठी घरगुती उपाय

**शूज काढल्यानंतर दुर्गंधी येण्याची समस्या केवळ काही विशिष्ट ऋतुपुरती मर्यादित नसते. पायाला घाम आल्यानंतर दुर्गंधी येते. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी किंवा ऑफिसमध्ये शूज काढणे त्रासदायक आणि काही वेळेस तुम्हाला खजील ठरणारे ठरू शकते. हिवाळ्याच्या दिवसात थंडीपासून रक्षण व्हावे म्हणून अनेकजण शूज वापरणे पसंत करतात. परंतु दुर्गंधीच्या त्रासामुळे टाळाटाळ करावी लागते. अशावेळी हा त्रास कमी करण्यासाठी डॉ. राहुल डोग्रा यांनी काही घरगुती उपाय सुचवले आहेत...**

**पायांची दुर्गंधी कमी करण्यासाठी काय कराल?**

आलं आणि पाणी वापरून पायांची दुर्गंधी कमी करता येऊ शकते. आलं चवीला आणि स्वादाला तिखट असते. त्याचे तीक्ष्ण गुणधर्म पायांमधील शुष्कता कमी करण्यास फायदेशीर ठरते. तसेच दुर्गंधी कमी करते. आल्यामधील डिटॉक्सिफाईंग घटक घामावर नियंत्रण मिळवण्यास फायदेशीर ठरते.

त्यामुळे दुर्गंधीचा त्रासही कमी होतो. यामुळे dermicidif, या प्रोटीनच्या निर्मितीला चालना मिळते. यामुळे दुर्गंधीचा त्रास वाढवणाऱ्या फंगस आणि बॅक्टेरियाचा त्रास कमी करण्यासाठी मदत होते.

▮ एका मोठ्या आल्याच्या तुकड्याची पेस्ट करा.

▮ कपभर पाणी उकळा आणि त्यामध्ये १०-१५ मिनिटे आल्याची पेस्ट बुडवा.

▮ त्यानंतर पाणी गाळा. गाळलेल्या पाण्याने रात्री झोपण्यापूर्वी पायाला मसाज करा.

▮ मसाज केल्यानंतर तुम्ही सॉक्स घालू शकता.

▮ थंडीच्या दिवसात रात्री पायाला मॉईश्चर मिळवण्यासाठी आवश्यक क्रीम लावा.

▮ पायाची त्वचा संवेदनशील व नाजूक असल्याने थंडीच्या दिवसात रुक्षता, शुष्कता वाढते. त्यामुळे पायांना नियमित तेलाने मसाज करा. यामुळे पायाला भेगा पडणे, त्वचा सुकून बाहेर पडणे अशा समस्यांही कमी होतील. हिवाळ्याच्या दिवसात किमान घरच्या घरी पेडिक्युर करावे. पायांना दुर्गंधी येऊ नये म्हणून आठवडाभर हा प्रयोग नियमित करावा.



# जुना स्मार्टफोन एक्स्चेंज करताना 'या' गोष्टींकडे द्या लक्ष, होणार फायदा, मिळेल चांगली किंमत

**जर तुम्ही नवीन स्मार्टफोन खरेदी करण्याचा विचार करत असाल आणि तुम्हाला त्याच्या किमतीवर सूट मिळवायची असेल, तर सध्याचा स्मार्टफोन एक्स्चेंज केल्यास तुम्हाला ही सूट मिळू शकते. अशा प्रकारचे ऑफर्स अनेकदा ई-कॉमर्स शॉपिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असतात. पण, तुमच्या लक्षात आले असेल की, काही वेळा ऑनलाइन कंपन्या चांगल्या स्थितीत असलेल्या स्मार्टफोनची किंमत सुद्धा कमी देतात. अशात काय करावे हा प्रश्न तुमच्याही मनात येत असेलच, नक्की काय केल्याने स्मार्टफोनच्या एक्स्चेंजवर चांगली किंमत मिळू शकेल हे सविस्तर जाणून घ्या.**



**स्मार्टफोन क्लिन करायला विसरू नका :**

तुम्ही स्मार्टफोन एक्स्चेंज करण्यापूर्वी स्वच्छ करायला विसरलात तर तुमच्या स्मार्टफोन एक्स्चेंज करताना तुम्हाला त्याची खूप कमी रक्कम मिळण्याची शक्यता असते. कारण, कोणतीही कंपनी खराब किंवा खूपच जुना दिसणाऱ्या स्मार्टफोनसाठी जास्त रक्कम देण्यास तयार होत नाही. अशा वेळी डिव्हाइस नेहमी स्वच्छ आणि चकाचक ठेवा.

**आवश्यक असल्यास बॅक पॅनल बदला :**

बऱ्याच वेळा एक्स्चेंज करायचा असतो, तो स्मार्टफोन फक्त काही महिने जुना असतो. परंतु त्याच्या मागील पॅनलवर स्क्रॅचेस येतात, असे झाल्यास नवीन स्मार्टफोन देखील खूप जुना दिसतो. हे होण्यापासून रोखण्यासाठी कोणत्याही ऑफरमध्ये स्मार्टफोन एक्स्चेंज करण्यापूर्वी तुम्हाला बॅक पॅनल बदलणे आवश्यक आहे.

**सॉफ्टवेअर अपडेट्स करण्याची खात्री करा :**

जुना स्मार्टफोन एक्स्चेंज करण्यापूर्वी त्याचे सॉफ्टवेअर अपडेट करण्याची खात्री करा, यामुळे फोनचा वेगदेखील वाढेल आणि तो हँग न होता फास्ट काम करेल. यामुळे तुमच्या फोनला चांगली किंमत मिळण्याची शक्यता देखील वाढते.

# लसणातील असणारे गुणधर्म जाणून घ्या!

**लसणामुळे फक्त जेवणच चविष्ट होते असे नाही, लसणामध्ये असे बरेच गुणधर्म आहेत जे आपल्या शरीरासाठी खूप महत्त्वपूर्ण आहेत. जाणून घेऊ की, या छोट्या लसणामध्ये कोणकोणते गुण लपलेले आहेत. रोज लसणाचे सेवन केल्यास टीबी होत नाही. लसून हे किटाणुनाशक आहे, एंटीबायोटिक औषधांसाठी हा एक चांगला विकल्प आहे, लसणामुळे टीबीचे किटाणू नष्ट होतात.**

**एंटीबायोटिक**

प्रथम लसणाला सोलून घ्या, लसणाच्या एका कुडीचे ३ ते ४ तुकडे करा. दोन्ही वेळेच्या जेवणानंतर अर्ध्या तासाने लसणाचे दोन तुकडे तोंडात ठेवून चगळा त्यानंतर पाणी प्या.

**डोकेदुखीसाठी रामबाण उपाय**

एका लसणाच्या ४ कुड्या तीस ग्राम मोहरीच्या तेलामध्ये टाका. तेल थोडे गरम करा आणि त्या तेलाने मालिश करा, डोके दुखणे थांबेल.

**दमा दूर करण्यासाठी उपयुक्त**

दम्याच्या त्रासावर लसून हे एक उपयुक्त औषध आहे. ३० मिली दुधामध्ये लसणाच्या पाच कुड्या टाकून दूध गरम करा. रोज हे गरम दूध प्यायल्याने दम्याचा त्रास कमी होण्यास मदत होईल. अद्रकाच्या चहामध्ये थोडा लसूण टाकल्याने दमा नियंत्रित राहतो.



# हीना-मोहरीच्या तेलाचे मिश्रण दूर करेल 'केसगळती'ची समस्या!

**सौंदर्यामध्ये 'केस' हे फार महत्त्वाचे असतात. त्यामुळे 'केसगळती' ही अनेकांच्या जीवाला घोर लावते. म्हणूनच तुमच्या केसगळतीचं नेमकं कारण वेळीच जाणून घेणं आवश्यक आहे. म्हणजे त्यावर योग्य उपचारपद्धतीने नियंत्रण मिळवता येते. बऱ्याच जणांमध्ये केसांना पुरेसे पोषण न मिळाल्याने केसगळती होते. मग अशांसाठी हीना-मोहरीच्या तेलाचे मिश्रण नक्कीच फायदेशीर ठरू शकते.**

**हीना व मोहरीच्या तेलाचे मिश्रण–**

केसांच्या आरोग्यासाठी 'हीना' अत्यंत फायदेशीर आहे. यामुळे केसांचा पोत सुधारतो तसेच टाळूचेदेखील पोषण होते. हीनामुळे केसांचे नुकसान टाळण्यास मदत होते. परिणामी केस चमकदार आणि दाट होतात. तर मोहरीचे तेल ॲण्टीबॅक्टेरियल आणि ॲण्टीफंगल असल्याने टाळूवरील इन्फेक्शन कमी करण्यास तसेच डॅण्डरफ (कोंडा) कमी करण्यास मदत करतात. यामुळे केसगळतीची मूळ कारणंच रोखण्यात मदत होते. परिणामी केसांचे आरोग्य सुधारते.



**कसे बनवाल हे मिश्रण?**

२५० ग्रॅम मोहरीचे तेल वाडग्यात गरम करा. त्यात ६० ग्रॅम हीना (मेहंदी) ची पानं मिसळून तेल पुरेसे गरम करा. पानं चॉकलेटी रंगाची होईपर्यंत मंद आचेवर तेल गरम करा. थोड्या वेळाने गॅस बंद करून हे मिश्रण मलमलच्या कापडातून गाळा. आता हे तेलाचे मिश्रण हवाबंद डब्यात झाकून ठेवा.

**कसे वापराल तेल?**

या तेलाच्या मिश्रणाचा नियमित टाळूवर हलका मसाज करा. यामुळे केसगळती रोखण्यास आणि केसांची वाढ होण्यास मदत होते. केसांचे आरोग्य सुधारण्यासाठी मसाज केल्यानंतर डोक्याला गरम पाण्यात भिजवलेला टॉवेल गुंडाळून ठेवावा. यामुळे तेल डोक्यात झिरपण्यास मदत होते.



# चमचाभर अळशीच्या सेवनाने कमी करा पीओएसचा त्रास!




**पीओएस** म्हणजेच polycystic ovarian syndrome या स्त्रियांमधील आजारामध्ये शरीरात हार्मोनल इम्बॅलन्स निर्माण होतो. पीसीओएसमुळे मासिक पाळीच्या वेळेस त्रास होणे, गर्भधारणेमध्ये दोष निर्माण होणे, वजन वाढणे, ॲक्नेचा त्रास वाढणे अशा समस्या वाढतात. पीसीओएसचा त्रास असणाऱ्यांमध्ये एंड्रोजन्स म्हणजेच पुरुषांचे हार्मोन्सचे प्रमाण वाढते. यामुळे लठ्ठपणा वाढतो. त्यावर मात करण्यासाठी वेळीच वैद्यकीय उपचारांची मदत घेणे आवश्यक आहे. मात्र यासोबतच काही नैसर्गिक उपायांनीदेखील पीसीओएसचा त्रास कमी होण्यास मदत होते. 'अळशी' या मसाल्याच्या पदार्थाने पीसीओएसवर नियंत्रण मिळवणे शक्य होते.

**पीओएसवर अळशी कशी ठरते फायदेशीर?**

अळशीमध्ये lignan नामक केमिकल घटक अधिक असतात. यासोबतच ओमेगा ३ फॅटी ॲसिडचा देखील मुबलक साठा असतो. काही अभ्यासानुसार प्रोस्टेट कॅन्सरच्या रुग्णांमध्ये, अळशीमधील lignan घटक ॲण्ड्रोजनची पातळी कमी करण्यास फायदेशीर ठरतात. तसेच पीसीओएसचा त्रास असणाऱ्या स्त्रियांना अळशी खायला दिल्यास त्यांच्यामधील ॲण्ड्रोजनची पातळीदेखील कमी होण्यास मदत होते.

**पीओएस त्रास कमी करण्यासाठी अळशीचा वापर**

३० ग्रॅम अळशी चार महिने आहारात घेतल्यास टेस्टेसटेरॉनच्या पातळीमध्ये फरक पडतो. तसेच लिपिड (कोलेस्टेरॉल) च्या प्रमाणामध्ये फरक दिसऊन येतो. ॲण्ड्रोजन कमी झाले तरीही कोलेस्ट्रेरॉल आणि ट्रिग्लायसिराईडच्या पातळीमध्ये फरक दिसून येतो. या अभ्यासाच्या सोबतीने काही क्लिनिकल डाटादेखील आवश्यक आहे.



**सुरक्षित आहे का?**


अभ्यासानुसार, ॲण्टी ॲण्ड्रोजेनस, इन्सुलिन लोअरिंग घटक किंवा औषधांमुळे मासिक पाळीची अनियमितता, गॅस्ट्रोइंटेन्शिअल्स लक्षण वाढतात. मात्र अळशीच्या सेवनामुळे हे दुष्परिणाम कमी होतात. मात्र कोणताही नैसर्गिक उपाय निवडण्याआधी तुमच्या डॉक्टरांशी बोलून सल्ला घेणे आवश्यक आहे.

**कशाप्रकारे कराल आहारात अळशीचा वापर?**

अळशी थेट खाण्यापेक्षा इतर पदार्थांसोबत मिसळून खाणे अधिक फायदेशीर आहे. चमचाभर अळशी मिल्कशेक, आमटी किंवा सलाडवर भुरभुरा. यासोबतच सकाळच्या नाश्त्याला दह्यासोबत अळशी खाऊ शकता. मात्र त्याचे प्रमाण योग्य डॉक्टरांकडून घेणे आवश्यक आहे. कारण अळशीचे सेवनाचे हे दुष्परिणामदेखील आहेत.

# लहानग्यांचा सर्दी-खोकला

**साडेतीन वर्षांचा शौर्य शिंका आणि खोकल्याने सकाळी बेजार झाला होता. सर्दीमुळे नाक गच्च झाल्यामुळे रात्री व्यवस्थित झोप झाली नव्हती. त्याच्याबरोबर दिवसभर कार्यालयात काम करणारी त्याची आईदेखील जागी होती. रात्री झालेल्या त्रासामुळे सकाळीच मायलेक दवाखान्यात हजर. दर दोन ते तीन महिन्यांनी याला सर्दी, खोकल्याचा त्रास होतो. पावसाळ्यात तर हा त्रास जास्त होतो. आजारी पडल्यावर तो खातपित नाही.. आईच्या तक्रारी सुरूच.**



**बालरोगतज्ज्ञ** म्हणून काम करताना पावसाळ्यात हा संवाद नित्याचा झाला आहे. सर्दी-खोकला साधा आजार असला तरी मुलांना होणाऱ्या त्रासामुळे त्यांच्याबरोबर तो पालकांनाही भंडावून सोडतो. पाच वर्षांच्या आतील मुलांमध्ये याचे प्रमाण अधिक जाणवते.

**सर्दी-खोकला का होतो?**

विषाणूंमुळे हा आजार होत असून २०० पेक्षा जास्त विषाणू याला कारणीभूत ठरतात. 'ॲहायनोव्हायरस' हा जवळपास ५० टक्के प्रकरणांमध्ये आढळतो. हवामान बदलामुळे पावसाळा व हिवाळ्यामध्ये सर्दी पडशाचे प्रमाण अधिक जाणवते. लहान मुलांची प्रतिकारशक्ती कमी असल्याने त्यांना हा त्रास जास्त होतो. त्यांच्या वायुमार्गाचा आकार कमी असल्याने श्वासनलिका लवकर प्रभावित होतात. यामुळेच पाच वर्षांच्या आतील बालकांना वर्षातून पाच ते सहा वेळा या आजाराची लागण होते. वयोमानानुसार या आजाराचे प्रमाण कमी होत जाते. पाळणाघरात राहणाऱ्या बालकांमध्ये सर्दी खोकल्याचे प्रमाण जास्त असते.

**संसर्ग कसा होतो?**

संसर्गजन्य व्यक्तीला, बालकांना हात लागल्यावर त्याच हातांनी स्वतःच्या डोळ्यांना, नाकाला, चेहऱ्याला स्पर्श करणे. आजारी व्यक्ती शिंकल्या, खोकल्यानंतर हे विषाणू वातावरणामध्ये दीर्घकाळ (१८ तासांपर्यंत) टिकू शकतात. त्या सान्निध्यात आलेल्या मुलांच्या श्वसनाद्वारे हे विषाणू शरीरात प्रवेश करतात. ते श्वसननलिकेत दाह निर्माण करतात व नाकाच्या आतील भागास सूज येते. हा दाह सर्दी-पडशाच्या लक्षणांना कारणीभूत ठरतो. नाकाबरोबर घसा, सायनस आणि स्वरयंत्रालादेखील त्रास जाणवू शकतो. आजारी बालक, व्यक्ती संसर्ग झाल्यापासून तीन ते पाच दिवस ते दोन आठवड्यापर्यंत विषाणूंचा प्रसार करू शकते.

**इतर समस्या आणि धोक्याची लक्षणे**

साधरणता ३० टक्के बालकांमध्ये कानाकडे जंतुसंसर्ग पसरू शकतो. सारखा सर्दी-खोकला होणाऱ्या मुलांमध्ये हे जास्त संभवते. कानाचा जंतुसंसर्ग वारंवार झाल्यास मुलांच्या श्रवण शक्तीवर याचा परिणाम होऊ शकतो. १३ टक्के मुलांमध्ये जंतुसंसर्ग होऊन तो सायनसपर्यंत पोहोचू शकतो. वाढत जाणारा ताप, डोळ्यांभोवती सूज येणे, श्वसनाची दुर्गंधी, चेहरा दुखणे ही काही लक्षणे आहेत. सायनस व मेंदू हे शेजारी असल्याने मेंदूकडे हा संसर्ग पसरू शकतो. लहान मुलांमध्ये न्यूमोनियाची लक्षणे जाणवू शकतात. ज्यामध्ये छातीची हालचाल वेगाने होणे, धाप लागणे, सुस्तावणे, ओठांचा-जिभेचा आणि नखाचा रंग निळसर पडणे आदी त्रास संभवतो. वरील लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला व उपाययोजना आवश्यक आहे.

**सर्दी-खोकल्याची लक्षणे**

▮ घसा खवखवणे ▮ नाक गच्च होणे ▮ नाकातून स्राव येणे ▮ लहान मुलांमध्ये ताप येणे, खोकला येणे, डोके दुखणे ▮ अनुनाशिक रक्तस्राव, कान दुखणे ▮ चिडचिड होणे, भूक न लागणे ▮ सर्दीचा त्रास सात ते दहा दिवसांपर्यंत राहू शकतो. खोकला साधारणता दोन आठवडे राहू शकतो.

**उपाय काय?**

साध्या सर्दी खोकल्यावर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार लक्षणात्मक उपचारपद्धती वापरावी. घरगुती उपचारात भरपूर झोप, विश्रांती मुलांना द्यावी. आहारात कोमट पाणी तसेच द्रवपदार्थाचा वापर करावा. तापामुळे मूल त्रासलेले असेल तर 'ॲण्टीपायरेटिक'चा वापर करावा. रात्रीच्या खोकल्यासाठी पाच-दहा मिली मध झोपण्याअगोदर मुलांना (एक वर्षांवरील) देऊ शकता. झोपताना मुलांचे डोके उंचावर ठेवावे. नाक गच्च असल्यास 'सलाइन ड्रॉप्स'चा वापर करावा. विषाणूजन्य आजार असल्याने प्रतिजैविकांचा वापर करू नये. मुलांमध्ये 'ओव्हर' व 'काऊंटर' उपलब्ध असलेली खोकल्याची औषधे देऊ नयेत. सहा वर्षांच्या आतील बालकांवर खोकल्याची औषधे परिणाम करीत नाहीत. 'झिंक' व जीवनसत्त्व 'क' काही प्रमाणात याचा त्रास कमी करू शकतात. यावर प्रतिबंधात्मक लस नाही. कारण विषाणू त्यांचे स्वरूप वारंवार बदलत असतात. पण हंगामी तापाची लस तापाच्या विषाणूंपासून रक्षण करते.

**प्रतिबंधात्मक काय काळजी घ्यावी?**

मुले शाळा, पाळणाघर किंवा बाहेरून खेळून आल्यानंतर २० ते ३० सेकंद हात स्वच्छ चोळून धुवावेत. आजारी व्यक्तींच्या चेहऱ्याला, डोळे, नाक वा तोंडाला स्पर्श करू नये. आजारी व्यक्तीपासून मुलांना दूर ठेवावे. आपल्या मुलांपासून दुसऱ्या मुलांना संसर्ग होणार नाही, याची काळजी घ्यावी. पावसाळ्याच्या दिवसात गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे. मुलांची प्रतिकारक्षमता वाढवण्यासाठी त्यांना सकस आहार द्यावा. मोकळ्या हवेत खेळण्यास, व्यायाम करण्यास प्रोत्साहन द्यावे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक – दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाल नं. १, एन. के. इंडस्ट्रीया इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई – 400 063 येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघररोड, शनी मंदिराजवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे – 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क :– 9594418181 / 8424989898